दि दा. क्र. 20/19
श्रीमती विजया व इतर वि.
झोल्कर.

## नि. क्र. 17 वरील आदेश

(1) दाव्यामध्ये दुरुस्ती होण्यासाठी अर्ज दाखल आहे.

(2) अर्ज वाचला: त्यावरील प्रतिवादीचा म्हणणे अवलोकन केले. उभय पक्षांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

(3) वादी यांच्या म्हणण्यानुसार, वाद मिळकत ही संजय श्रीराम सवलोक यांना बेकायदेशीर रित्या खरेदी दिल्याचे वादी यांना 20.3.21 रोजी समजले. सदर बेकायदेशीर खरेदीखताची माहिती झाल्याच्या बेराबर वादी यांनी उप अधीक्षक भूमि अभिलेख, नेवासा यांना दि 22.3.21 रोजी वादमिळकतीच्या प्रमाणित प्रती मिळण्यासाठी अर्ज दिला. तेव्हा, प्रथमच वादी यांना प्रतिवादीची लबाडी व वाद मिळकतीच्या बेकायदेशीर खरेदीबाबी माहिती मिळाली. त्यामुळे, दाव्यामध्ये परिच्छेद 11 च्या खाली परिच्छेद क्र. 11 अ ला समाविष्ट करावा व परिच्छेद क्र 18 खाली परिच्छेद क्र 18 अ समाविष्ट करुन दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी द्यावी, अशी वादी यांची विनंती आहे.

Scanned with CamScanner

(४) दावा दाखल झालेनंतर वर नमूद बदल झालेले असलेने दाव्याच्या स्वरूपात कोणतेही बदल होणार नाहीत, असे वादी यांचे म्हणणे आहे. त्याप्रमाणे, प्रतिवादी यांच्यावर दुरुस्तीमुळे कोणताही अन्याय होणार नाही, असे वादी यांचे म्हणणे आहे. अर्ज मंजूर करणेस त्यांची विनंती आहे.

(५) प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे (नि २१) सादर केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्ज बेकायदेशीर असुन रद्द होण्यास पात्र आहे. दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात बदल होणार आहेत. वादीला प्रकरणाच्या या स्थितीला अर्ज दाखल करता येणार नाही. अर्ज नामंजूर करण्याची त्यांची विनंती आहे.

(६) पुढील मुद्दे विचारार्थ निघत असुन त्यावरील निष्कर्ष कारणांसहित पुढीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| अ) प्रस्तावित दुरुस्ती दाव्यातील वादाच्या निराकरणासाठी आवश्यक आहे काय ? | होय |
| ब) प्रस्तावित दुरुस्तीने प्रतिवादीला हक्काचा संकोच होणार आहे काय ? | नाही. |
| क) आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

Scanned with CamScanner

दि. दा. क्र 20/19
नि. 17

## कारणमिमांसा

### मुद्दे क्र. 1 ते 3 बाबत

(7) दावा घोषणेच्या, नाव्याच्या व निरंतर मनाई हुकमाच्या मागणासाठी दाखल आहे. दावा दि. 18.4.19 रोजी दाखल झाला आहे. वादीने आभिलेखावर अर्जसोबत सिटी सर्वे नं 341 व 342 ची (वादमिळकत) आखिव पत्रिका सादर केली आहे. त्यानुसार, संजय श्रीराम सवलोड यांच्या नावे सि.स. नं 341 व 342 मधील मिळकतीची नोंद 18/1/21 रोजी झाल्याचे दिसुन येते.

(8) दावा नि क्र. 5 च्या चौकशीसाठी नेमला असताना अर्ज दाखल झाला आहे. प्रकरणातील सुनावणीची स्थिती पहाता दाव्यामध्ये परिणामकारक चौकशी अदयाप सुरु होणे बाकी आहे. प्रतिवादि यांच्या अतिरिक्त कैफियतीत त्यांचे दाव्यातील दुरुस्तीवर म्हणणे नोंदवुन वादी यांच्या कथनांचे खंडन करु शकतात. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश 6 नियम 17 नुसार, प्रस्तावित दुरुस्ती मंजूर केलेस दाव्याचा निकाल

Scanned with CamScanner

गुणातत्वावर देण्यास मदत होणार आहे. त्यामुळे, प्रतिवादी यांच्या हक्काला संकोच होणार नाही अथवा दाव्याच्या स्वरूपात बदल होणार नाही. दाव्यामध्ये वादी यांना त्यांची बाजू पारदर्शकपणे मांडण्याची संधी दिली नाही तर दाव्याचे निराकरण योग्यरित्या होणार नाही. सबब, मुद्दे क्र. १ व २ चे उत्तर होय असे नोंदवून ३ बाबत पुढील आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

(1) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

(2) वादी यांनी विहीत मुदतीत प्रस्तावित दुरुस्ती करावी.

७/११/२१

नेवासा.

श्रीमती बी. के. पाटील
२ रे सह दिवाणी न्यायाधीश
(वरिष्ठ स्तर)

Scanned with CamScanner